International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - patsanstharegulatoryboard@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/नि.मं.सुचना/बिझनेस करस्पॉन्डंट्स/२०२०/२०२५ दिनांक : १८ ऑगस्ट, २०२५

# परिपत्रक

**बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) बिगरशेती पतसंस्था**

**प्रस्तावना-**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने सर्वप्रथम सन २००६ मध्ये परिपत्रक क्र.RBI/२००५-०६/२८८ DBOD.No.BL.BC.५८/२२.०१.००१/२००५-२००६, दि.२५/०१/२००६ नुसार नागरी बँकां-व्यतिरिक्त सार्वजनिक वाणिज्य व प्रादेशिक ग्रामीण बँकांना आणि त्यानंतर सन २०१० मध्ये परिपत्रक क्र.RBI/२०१०-११/३०८ UBD.BPD.(PCB).Cir.No.२८/०९.१८.३००/२०१०-११, दि.१०/१२/२०१० नुसार नागरी सहकारी बँकांना 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे माध्यमातून तृतीय-पक्ष सेवांद्वारे ग्राहकांच्या दाराशी बँकिंग सेवा पोहोचविण्याची काही निकष पूर्तीच्या अटीवर परवानगी दिली आहे.

'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स' हे लहान शहरे किंवा गावांमध्ये बँकिंग सेवा देण्यासाठी अधिकृत बँक प्रतिनिधी असतात. हे बँकांचे प्रतिनिधित्व करणारे रिटेल एजंट असतात आणि ग्राहकांच्या दाराशी वाजवी सेवा दरात बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी मदत करतात. एक प्रकारे ते आर्थिक समावेशनाला (Financial Inclusion) प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचे योगदान देतात, जेणेकरून बँकिंग सेवा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांना वाजवी किमतीमध्ये बँकिंग सेवा उपलब्ध होऊ शकते.

सद्यस्थितीत बँकिंग क्षेत्रामध्ये बचत खाते उघडणे, रोख ठेव (स्वतःची बँक/इतर बँक), रोख रक्कम काढणे (स्वतःची बँक/इतर), निधी हस्तांतरण (बँकेत), शिल्लक चौकशी, मिनी स्टेटमेंट इत्यादीसारख्या आवश्यक बँकिंग सेवा आणि आयएमपीएस, एनईएफटी, चेक स्टेटस चौकशी, डेबिट कार्ड जारी करणे आणि सर्व प्रकारचे कर्ज अर्ज यासारख्या सेवा 'बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे माध्यमातून दिल्या जात असून त्यांचे मार्फत बँकेचे ग्राहकांना आर्थिक साक्षर करण्याचा देखील प्रयत्न केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर पूर्वीपासून काही बिगरशेती पतसंस्था तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांनी वारंवार मागणी केली आहे.या संदर्भात सन २०१३ पासून आदर्श उपविधीमध्ये अशा सेवा देण्याबद्दल तरतूद आहे. मात्र त्या संदर्भात कोणतेही निकष व आदर्श कार्यपद्धती नसल्याने काही संस्थांनी याबाबतीत त्यांचे नियम तयार केल्याने या व्यवहारात एकवाक्यता, सुरक्षितता व पारदर्शकता आणण्याचे दृष्टीने, तसेच या कार्यपद्धतीमधील संदिग्धता दुर करणेचे दृष्टीने, सहकारी पतसंस्थामधील याबाबत कामकाजाच्या दृष्टीने असणारी तफावत पाहता, राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांना 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करण्याबाबत स्पष्टीकरणासह सर्वसमावेशक परिपत्रकीय मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करता येतील. मात्र पगारदार सहकारी पतसंस्था यांना 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करता येणार नसल्याने, त्यांना या परिपत्रकिय सूचना लागू राहणार नाहीत. या अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्वसमावेशक परिपत्रकीय सूचना वजा निर्देश देण्यात येत आहेत.

**पात्रता निकष-**

खालील निकष पूर्ण करणाऱ्या बिगर शेती सहकारी पतसंस्था 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करून त्यांचे माध्यमातून केवळ त्यांचेच कार्यक्षेत्रात सेवा देण्यास पात्र आहेत.

१. सी.आर.ए.आर. चे प्रमाण ९ टक्क्यांपेक्षा जास्त असावे.
२. ५ टक्क्यांपेक्षा कमी निव्वळ एन.पी.ए. असावा.
३. सी.आर.आर. आणि एस.एल.आर. राखण्यात कोणतीही कसूर असता कामा नये.
४. सतत सरासरी खेळत्या भांडवलाचे किमान १ टक्का निव्वळ नफा असावा
५. संस्थेचे ऑपरेटीव्ह खात्यांचे १०० टक्के के.वाय.सी. पूर्तता, तसेच सर्व खात्यांचे यु.सी.आय.सी. अद्ययावत पूर्तता बाबतीत वैधानिक लेखापरीक्षक यांचे प्रमाणपत्र असावे
६. स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणाली (सिस्टम बेस) द्वारे मालमत्ता वर्गीकरण अचूक होण्यासाठी संस्थेने व्यापक सायबर सुरक्षा फ्रेमवर्क आवश्यक असून या क्षेत्रातील अधिकृत व सक्षम व्यक्ती अथवा संस्थेचे स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणालीचे (सिस्टम बेस) सिस्टिम ऑडीट झालेले असावे.
७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये कोणतीही कारवाई सुरु नसावी अथवा पूर्वीचे कारवाईत दोष मुक्तता असावी.

(वरील सर्व बाबी पूर्तते बाबतीत संस्थेचे विद्यमान वैधानिक लेखा परीक्षक यांचे प्रमाणपत्र दप्तरी असणे अनिवार्य राहील.)

**बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) पात्रता निकष -**

खालील नमूद संस्था 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' म्हणून नियुक्तीस पात्र असतील.

१. बँकिंग व्यवसाय करणारी कोणतीही संस्था किंवा बिगरशेती नागरी सहकारी पतसंस्था (पगारदार पतसंस्थेसह) तसेच विकास संस्था वगळून अन्य कोणतीही नोंदणीकृत सहकारी संस्था
२. कंपनी कायदा, १९५६ व २०१३ च्या अंतर्गत नोंदणीकृत बँकिंग व्यवसाय करणारी कंपनी वगळून अन्य कोणतीही नोंदणीकृत कंपनी
३. नोंदणीकृत ट्रस्ट / एलएलपी सह भागीदारी संस्था

**अपात्रता-**

'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' म्हणून खालील नमूद संस्था नियुक्तीस पात्र असणार नाहीत.

१. बिगरशेती पतसंस्थेचे विद्यमान संचालक, कर्मचारी, पिग्मी एजंट आणि त्यांचे नातेवाईक तसेच त्यांचेशी संबधित असणारी कोणतीही संस्था.
२. वर नमूद पात्रता प्राप्त असणाऱ्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती प्रोप्रायटर, व्यक्तींचा समूह अथवा संस्था हे 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' म्हणून नियुक्तीस पात्र असणार नाहीत.

**नियुक्ती अधिकार —**

'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्तीबाबतीत प्रत्येक संस्थेने धोरण बनवणे अनिवार्य असून, त्याचे नियुक्ती अथवा अन्य सर्व अनुषंगिक अधिकार संचालक मंडळाला राहतील. या संदर्भात 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती अथवा त्यांची सेवा रद्द बाबत माहिती १५ दिवसाचे आत संबधित निबंधक यांना पाठवणे संस्थेवर बंधनकारक असेल. 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करताना संस्थेने जाहिरात देणे आवश्यक असून, प्राप्त पात्रता धारक अर्जामधून आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी (due diligence) करून नियुक्ती करणे आवश्यक आहे.

9

**बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) व्यवसाय व्याप्ती –**

सद्य स्थितीत केवळ केवळ चालू अथवा बचत ठेव किंवा जे.एल.जी.गट व सोने तारण या दोन कर्ज व्यवहारापुरतीच केवळ खालील नमूद मर्यदित स्वरुपात सेवा देण्यासाठी 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' नियुक्ती करता येईल उर्वरित अन्य कोणत्याही व्यवहारासाठी अशी नियुक्ती करता येणार नाही. पिग्मी ठेव योजनेचे स्वरूप स्वत्रंत असल्याने व त्यासाठी सहकार खाते / नियामक मंडळ यांचेकडून वेळोवेळी स्वत्रंत सूचना निर्गमित होत असल्याने या परिपत्रकातील सूचना त्यांचे साठी लागू राहणार नाहीत.

या मध्ये 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांची खालीलप्रमाणे कार्य व्याप्ती मर्यादित राहील

१) फोन बँकिंग, इंटरनेट बँकिंग इत्यादी कोणत्याही डिजिटल सुरक्षित व सोयीस्कर माध्यमाद्वारे मिळालेल्या विनंतीवर खात्यातून पैसे काढण्यासाठी रोख रक्कम पाठवणे व त्याची पोहोच घेऊन संस्थेकडे देणे.
२) आपल्या ग्राहकांना जाणून घ्या (KYC) बाबतची कागदपत्रे ग्राहकाकडून घेऊन संस्थेला सादर करणे व हि प्रक्रिया पूर्ण करण्यास ग्राहकास मदत करणे.
३) चालू अथवा बचत ठेव खाते उघडणेचा किंवा जे.एल.जी.गट व सोने तारण कर्ज मागणी अर्ज भरण्यास ग्राहकास मदत करणे.
४) चालू अथवा बचत ठेव खाते, जे.एल.जी.गट व सोने तारण कर्ज प्रकारांची योग्य ती माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवणे.
५) संस्थेसाठी चालू अथवा बचत ठेव खाते तसेच जे.एल.जी.गट व सोने तारण कर्जासाठी नवीन ग्राहक जोडणेसाठी प्रयत्न करणे.
६) चालू अथवा बचत ठेव खाते तसेच जे.एल.जी.गट व सोने तारण कर्ज अर्ज याबाबतीत संस्थेने विहित केलेली कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर अनुषंगिक प्रक्रिया करून संस्थेकडे पोहोचवणे.
७) संस्थेने 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे माध्यमातून वितरीत झालेल्या जे.एल.जी.गट व सोने तारण कर्ज वितरणानंतर त्या कर्जावर योग्य देखरेख करणे
८) 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे माध्यमातून वितरीत झालेल्या जे.एल.जी.गट व सोने तारण कर्ज वसुलीसाठी ग्राहकांचा पाठपुरावा करणे.

**व्यवसाया सहभागासाठी करार -अटी व शर्ती**

१) लेखी कराराच्या अटी आणि शर्ती कायदेशीर भाषेत परिभाषित असाव्यात तसेच संस्थेच्या कायदेशीर सल्लागाराने त्यांच्या कायदेशीर परिणाम आणि अंमलबजावणीबद्दल खात्री करणे आवश्यक आहे.
२) करारात प्रामुख्याने सदर व्यवहारातील जोखीम कमी करण्याच्या धोरणांना प्राधान्य असले पाहिजे.
३) करार पुरेसा लवचिक असावा, जेणेकरून संस्थेला बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) च्या एकूण कार्यपद्धती व व्यवहारावर योग्य पद्धतीने नियंत्रण ठेवता येईल.
४) जोखीम नियंत्रण तसेच करारातील अटी / शर्ती आणि सहकार खाते /नियामक मंडळ यांच्या मार्गदर्शक सूचना याची पूर्तता होत असल्याची खात्री करण्यासाठी, करारातील निर्धारित दिवसांची पूर्व सूचना देऊन 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे केवळ त्या संस्थेशी संबधित असणारे सर्व व्यवहार, कागदपत्रे, संबंधित सर्व पुस्तके, रेकॉर्ड आणि माहितीचे लेखापरीक्षण किंवा तपासणी /हस्तक्षेप करणे किंवा आवश्यक कागदपत्र/माहिती मागणे किंवा मिळवणे इत्यादी संबधी संस्था कर्मचारी किंवा संस्थेने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला तसेच निबंधक (सहकार खाते) किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला अधिकार करारात नमूद असणे अनिवार्य राहील.
५) 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' ला कोणत्या सेवा करारामध्ये कोणत्या सेवा देणेसाठी सहमती दिली असून त्याचे कार्यक्षेत्र, अधिकार आणि जबाबदारी इ. बाबतीत करारात स्पष्टता असली पाहिजे.
६) करारात 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांनी सतत निरीक्षण आणि मूल्यांकन करण्याची तरतूद असावी जेणेकरून आवश्यक ती सुधारणा उपाय त्वरित सुरू करता येतील.

७) सुरक्षेचा भंग आणि ग्राहकांशी संबंधित माहितीची गोपनीयता भंग झाल्यास ग्राहकांच्या डेटाची गोपनीयता तसेच ग्राहक अथवा संस्थेचे आर्थिक नुकसान अथवा प्रतिष्ठा कमी झाल्यास होणारे नुकसान याबद्दल 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' ची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी करारात तरतूद समाविष्ट असावी.

८) करार समाप्ती कलम आणि सूचना कालावधी समाविष्ट केला पाहिजे.

९) व्यवसाय सातत्य सुनिश्चित करण्यासाठी आकस्मिक योजना समाविष्ट केल्या पाहिजेत.

१०) करारात आउटसोर्स केलेल्या सेवा 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' हे अन्य कोणत्याही उपकंत्राटदारांला प्रदान करण्याचे हक्क प्रतिबंधित करण्याची तरतूद करारात असली पाहिजे.

११) 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' चे व्यवहारातील नुकसान अथवा संस्था प्रतिमेबद्दल दक्षता घेणेचा तसेच नुकसान भरपाई कोणत्या परिस्थितीत व कोणी आणि किती द्यावयाची याचा देखील स्पष्ट उल्लेख करारात असावा.

१२) कराराचे पालन न झाल्यास व त्या संबधी काही वाद विवाद झाल्यास तो सोडवणे बाबतची तरतूद करारात असावी.

**सेवा शुल्क आणि कमिशन-**

बीसी मॉडेलची व्यवहार्यता सुनिश्चित करण्यासाठी, 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांना संस्थेतर्फे कोणतेही शुल्क अथवा कमिशन दिले जाणार नाही. याबाबतीत संस्थेच्या संचालक मंडळाने या विषयीच्या मंजूर केलेल्या धोरणाअंतर्गत पारदर्शक पद्धतीने ग्राहकांकडून 'वाजवी सेवा शुल्क' वसूल करण्यास 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांना अधिकार राहील. मात्र हे शुल्क कोणत्याही स्थितीत कर्ज मंजूर रकमेच्या द.सा.द.शे. ३% (अधिक वस्तू व सेवा कर) पेक्षा अधिक असणार नाही. हे शुल्क किंवा कमिशन बाबतीत ग्राहकाला पूर्व कल्पना देण्याची जबाबदारी संस्थेची राहील तसेच यातील ५० टक्के शुल्क कर्ज व्यवहार मंजुरीचे वेळी व उर्वरित ५०% रक्कम कर्ज व्यवहार समाप्ती नंतर ग्राहकाकडून वसुलीचा बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) यांना अधिकार राहील. चालू अथवा बचत ठेव नमूद व्यवहारासाठी संस्थेने तारतम्याने शुल्क ठरवणे आवश्यक आहे.

शुल्क / कमिशन पारदर्शक नसल्या / वाजवी नसल्याबद्दल ग्राहकांकडून कोणत्याही 'तक्रारी' येणार नाहीत याची संस्थेने दक्षता घ्यावी. या संदर्भात संस्थेने स्वीकारलेल्या कोणत्याही अन्याय्य पद्धतींचा निबंधक यांचे कडून गांभीर्याने विचार केला जाईल.

**सेवांबद्दल तक्रारींचे निवारण**

'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' कडून देण्यात येणाऱ्या सेवांबद्दलच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संस्थेने उपविधीत तरतूद केली असल्यास त्यानुसार, अन्यथा संचालक मंडळ मान्यतेने तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावी आणि तक्रार निवारण संपर्क अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्क क्रमांक इलेक्ट्रॉनिक आणि शाखा व मुख्यालय इमारतीमध्ये दर्शनी भागात व्यापकपणे प्रसिद्ध केले पाहिजेत. तक्रार निवारण यंत्रणेमार्फत ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित व विहित मुदतीत निवारण केले जाईल याची खात्री करणेबाबत संस्थेने दक्षता घ्यावी. जर तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत तक्रारदाराला संस्थेकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही, तर तक्रारदारास तक्रारींचे निवारण करण्यासाठी संबंधित निबंधक यांचेशी संपर्क साधण्याचा पर्याय असेल.

**नो युवर कस्टमर (केवायसी) व सिबिल रिपोर्ट नियमांचे पालन**

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील बँकिंग सुविधा प्राप्त होत नसलेल्या लोकसंख्येला चालू व ठेव बचत ठेव खाते उघडण्यास व छोट्या रकमेची कर्ज सुविधा देणेसाठी सहाय्य करणे या उद्देशापोटी हि सुविधा दिली असली तरी सहकार खाते/नियामक मंडळ यांनी वेळोवेळी निर्देशित केल्या नुसार संस्थेने निर्धारित केलेल्या **नो युवर कस्टमर** (केवायसी) व सिबिल रिपोर्ट (CRIF High Mark सह) च्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारवर पूर्तता करणे हे बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) यांचेवर बंधन राहील तसेच संस्थेने त्याची यथा योग्य पूर्तता झाल्याची खात्री करणे अनिवार्य राहील.

**इतर अटी आणि शर्ती**

१) या अंतर्गत अदा केल्या जाणाऱ्या बचत किंवा जे.एल.जी.गट व सोने तारण या दोन कर्जा बाबतीत सहकार खाते/नियामक मंडळ यांनी वेळोवेळी निर्देशित केल्या नुसार संस्थेने निर्धारित केलेल्या कर्ज नियमावली नुसार सर्व कागदपत्रे पूर्तता व जोखीम व्यवस्थापनाबाबत सर्वतोपरी दक्षता तसेच तारण सुरक्षा व पुरेसे विमा संरक्षण जबाबदारी संस्थेची असेल. तसेच या संदर्भात आवश्यक कायदेशीर सल्लागार व अधिकृत मुल्यांकनकार नियुक्तीचा संस्थेचा अधिकार असेल.

२) या व्यवहार अंतर्गत ठेवले जाणारे हिशोब, सर्व कागदपत्रे व तारण हे सर्व संस्थेच्या ताब्यात राहील व ते सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३) या व्यवहार अंतर्गत तारण तपासणी, मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन करताना संबधित मुल्यांकनकार व ग्राहकाची संमती व समक्ष उपस्थिती अनिवार्य राहील. मात्र पुनर्मुल्यांकन करताना संबधित मुल्यांकनकार व ग्राहकाची संमती व समक्ष उपस्थिती आवश्यक नसल्याबद्दल अशी मुल्यांकनकार व ग्राहकाची संमती कर्ज अदा करताना घेतली असल्यास संबधित कर्ज करार पत्रात किंवा स्वतंत्र करारद्वारे अधिकार दिले असतील तर त्याच्या कायदेशीर वैधतेबद्दल संस्थेने त्यांचे नाम तालीकेवरील वकिलांचे लिखित अभिमत दप्तरी घेणे आवश्यक आहे.

४) 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' संस्थेची प्रतिष्ठा, कायदेशीर आणि व्यावहारिक जोखीम कमी होणार नाही याची संस्थेने अधिक दक्षता घेतली पाहिजे.

५) संस्थेच्या या सेवा अधिक किफायतशीर व सुरक्षित पद्धतीने ग्राहकापर्यंत पोहोचण्यासाठी तंत्रज्ञान-आधारित अधिक सुरक्षात्मक उपायांचा अवलंब करण्याचा संस्थेने प्रयत्न केला पाहिजे.

६) संस्थेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी या व्यवहारांच्या अंमलबजावणीचे बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. त्यांनी असे व्यवहार असणाऱ्या शाखांना तसेच 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे व्यवसाय ठिकाणी व संबधित ग्राहकांचे निवास अथवा व्यवसाय ठिकाणी नियमित भेट देणे आवश्यक आहे. सदर भेटी दरम्यान 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' च्या कामकाजाचे निरीक्षण करून तसा निष्कर्ष अहवाल संचालक मंडळाल सादर केला पाहीजे.

७) संचालक मंडळाने या बाबतीत संचालक मंडळ सभेच्या विषय पत्रिकेवर स्वतंत्र विषय घेऊन किमान दर तिमाही 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' या व्यवहारांचा आढावा घेतला पाहिजे

८) या माध्यमाद्वारे संस्थेच्या बँकिंग सेवेचा अधिकाधिक प्रसार, प्रचार व वापर करण्यासाठी, संस्थेने त्यांच्या ग्राहकांना संबंधित स्थानिक भाषांमध्ये - प्रिंट, इलेक्ट्रॉनिक इत्यादी विविध माध्यमांद्वारे शिक्षित करण्यासाठी प्रयत्न करून, बँकिंग सवयीचे फायदे, 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' ची भूमिका आणि ग्राहकांप्रती त्यांचे कर्तव्य व जबाबदारी याबद्दल 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांचे माध्यमातून व्यापक प्रसिद्धी द्यावी.

९) संस्थेने नियुक्त केलेल्या 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' तसेच त्यांचे मार्फत संस्था देत असलेल्या सेवांबद्दलची माहिती संस्थेच्या वेबसाइटवर तसेच वार्षिक अहवालात प्रसिद्ध करावी

१०) या अंतर्गत रोख रकमेचे व्यवहार करताना आवश्यक सुरक्षा व्यवस्था व पुरेसे विमा संरक्षण बाबतीत संस्था व 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' दोघांनीही खात्री करणे आवश्यक आहे.

११) 'बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी)' यांनी यांचे ताब्यात असलेल्या संस्थेच्या ग्राहकांच्या माहितीची सुरक्षा आणि गोपनीयता राखली पाहिजे.

**बिझनेस किंवा बँकिंग करस्पॉन्डंट्स (बीसी) नियुक्ती धोरण –**

या संदर्भात संस्थेने वरील किमान सर्व बाबी समाविष्ठ करून धोरण संचालक मंडळ मंजुरी करणे आवश्यक असून, वरील बाबी शिवाय सुरक्षा व जोखीम नियमन करण्यासाठी अजूनही काही अतिरिक्त अटी/शर्ती अथवा बाबी समाविष्ठ करता येतील. संचालक मंडळ मंजूर धोरणाची प्रत संबंधित निबंधक यांना मंजुरी नंतर १५ दिवसाचे आत पाठवणे अनिवार्य राहील. संस्थेने प्रती वर्षी एप्रिल महिन्यामध्ये या धोरणाचे पुनर्विलोकन करून त्यात बदल असल्यास तशा दुरुस्तीसह किंवा बदल नसला तर तसा उल्लेख करून संचालक मंडळ मंजूरी आवश्यक असून सादर पुनर्विलोकन धोरण प्रत देखील संबंधित निबंधक यांना मंजुरी नंतर १५ दिवसाचे आत पाठवणे अनिवार्य राहील.

पतसंस्थांच्या संचालक मंडळाने यासंदर्भात सेवकांसाठी जबाबदारी व उत्तरदायित्व धोरण ठरवणे आवश्यक आहे. असे धोरण न ठरवल्यास किंवा धोरण ठरवूनही अशा बाबी निदर्शनास आल्यास, संबंधीत संस्थेचे संचालक मंडळदेखील उचित वैधानिक कारवाईस पात्र राहील. संबंधीत वैधानिक लेखापरीक्षकानी याबाबत आपले अभिप्राय लेखापरीक्षण अहवालात नोंदविणे आवश्यक आहे.

**समारोप**

सदर परिपत्रकातील सुचनांचा अर्थ लावताना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचे निराकरण करणे किंवा अधिक स्पष्टीकरण निर्गमित करण्याचे अंतिम अधिकार सहकार आयुक्त व निबंधक यांचे राहतील.

प्रस्तुतचे परिपत्रक निर्गमित केलेचे दिनांकापासून राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांना लागू होतील. सदर परिपत्रकामध्ये नमूद नियमांसंदर्भात क्षेत्रीय स्तरावर / आयुक्त कार्यालयाचे स्तरावर पोटनियम दुरुस्तीद्वारे कोणतेही बदल करता येणार नाहीत.

सदर सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील संबंधित तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी. सदर सुचनांनुसार कार्यवाही झाली किंवा नाही, याबाबत संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी आपल्या लेखापरिक्षण अहवालात उचित ठिकाणी स्पष्ट अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे. सदरनुसार कार्यवाही न करणारे संबंधित वैधानिक लेखापरिक्षक हे उचित वैधानिक कारवाईस पात्र राहतील.

Taware

**(दिपक तावरे** भा.प्र.से.**)**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), (सर्व).
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (सर्व).
५) दि इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई-४०००५१.
६) दि इन्स्टीटयुट ऑफ कॉस्ट ॲन्डवर्क्स अकौंटंटस ऑफ इंडिया, जन्मभूमीमार्ग, फोर्ट, मुंबई.
७) अध्यक्ष/सचिव, ऑडीटर्स कौन्सिल ॲन्ड वेलफेअर असो., पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
८) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य को-ऑप.ऑडीटर्स महासंघ, पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
१०) प्रमाणित लेखापरीक्षकांच्या जिल्हास्तरीय संघटना (सर्व),
११) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,............................ (सर्व पतसंस्था फेडरेशन)
(राज्य/ विभागीय / जिल्हा/ तालुका )
१२) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक /सचिव ,........................... नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. ...............तालुका ................जिल्हा .......

**प्रत माहितीस्तव -**

१) पर्यवेक्षकीय अधिकारी (सर्व), मुख्यालय, पुणे
२) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय,पुणे
(कार्यालय संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव)
३) निवड नस्ती.

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर,**

मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२.